# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११००४.

**विषय** : उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) एप्रिल-मे २०२१ लेखी परीक्षा वेळापत्रकाबाबत...

## प्र क ट न

एप्रिल-मे २०२१ मध्ये महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, औरंगाबाद, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) व माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) लेखी परीक्षांचे संभाव्य वेळापत्रके मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर दिनांक १६/०२/२०२१ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली होती. सदर वेळापत्रकांबाबत सुचना असल्यास मंडळाकडे दिनांक २२/०२/२०२१ पर्यंत लेखी स्वरूपात मागविण्यात आलेल्या होत्या. त्यानुसार संघटना, पालक, शिक्षक व विद्यार्थी यांचेकडून प्राप्त झालेल्या सूचनांचे अवलोकन करून, **इ.१२वी व इ.१०वी ची संभाव्य वेळापत्रकेच अंतिम करण्यात आलेली आहेत.** अंतिम वेळापत्रकानुसार लेखी परीक्षा खालील कालावधीत आयोजित केलेल्या आहेत.

| अ.क्र. | तपशील | लेखी परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| १) | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (सर्वसाधारण व द्विलक्षी विषय) व उच्च माध्यमिक व्यवसाय अभ्यासक्रम (पुनर्रचित व जुना अभ्यासक्रम) | शुक्रवार दि. २३ एप्रिल २०२१ ते शुक्रवार दि. २१ मे २०२१ |
| २) | माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा | गुरुवार दि. २९ एप्रिल २०२१ ते गुरुवार दि. २० मे २०२१ |

उपरोक्त कालावधीमध्ये आयोजित केलेली दिनांकनिहाय सविस्तर अंतिम वेळापत्रके मंडळाच्या अधिकृत www.mahahsscboard.in संकेतस्थळावर दिनांक २६/०२/२०२१ पासून उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत.

**मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रकांची सुविधा ही फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी माध्यमिक शाळा/उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे छापील स्वरुपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असेल. त्या छापील वेळापत्रकावरून परीक्षेच्या तारखांची खात्री करून घ्यावी व विद्यार्थ्यांनी परीक्षेस प्रविष्ट व्हावे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छपाई केलेले तसेच व्हॉट्सअॅप किंवा तत्सम माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक ग्राह्य धरू नये.**

**प्रात्यक्षिक परीक्षा, श्रेणी, तोंडी परीक्षा व अन्य विषयांचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परीक्षेपूर्वी मंडळामार्फत शाळा/कनिष्ठ महाविद्यालय यांना कळविण्यात येत आहे.**

सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : २६/०२/२०२१

(डॉ.अशोक भोसले)
सचिव,
राज्यमंडळ, पुणे-४